# 'ईपीडब्लू'च्या टॉप फाईव्हमध्ये डॉ. तळुले

उजळाईवाडी, ता. ५ : इकॉनॉमिक अॅन्ड पॉलिटिकल विकली (ईपीडब्लू) या प्रख्यात नियतकालिकाच्या गतवर्षीच्या पहिल्या पाच सर्वोत्कृष्ट संशोधक लेखकांच्या यादीत शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागाचे प्रमुख प्रा. डॉ. ज्ञानदेव तळुले यांचा समावेश झाला. विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकरी आत्महत्यांसंदर्भातील प्रा. तळुले यांच्या शोधनिबंधासाठी त्यांचा टॉप फाईव्हमध्ये गौरव झाला.



**प्रा. डॉ. ज्ञानदेव तळुले**

प्रा. तळुले यांनी २००१ ते २०१८ जुलै या कालखंडातील आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांची माहिती संकलित केली. आत्महत्याग्रस्त कुटुंबांचे सर्वेक्षण केल्यानंतर हाती आलेल्या माहितीचे विश्लेषण करून त्या आधारावर त्यांनी शोधनिबंध तयार केला. शेतकरी आत्महत्यांच्या कारणांचा त्यांनी या माहितीच्या अधारे शोध घेण्याचा प्रयत्न केला. आत्महत्या रोखण्यासाठी प्रशासकीय स्तरावर काय उपाययोजना करता येतील, याची मांडणीही त्यांनी या शोधनिबंधात केली आहे. पंजाब, कर्नाटक, केरळमध्ये शेतकरी आत्महत्या रोखण्यास त्या त्या सरकारला यश आले आहे. महाराष्ट्र, आंध्र प्रदेशात मात्र त्या होत आहेत. याच्या मुळाशी असलेल्या विविध कारणांचा परामर्श प्रा. तळुले यांनी घेतला आहे. त्यांचे हे संशोधन 'इकॉनॉमिक अॅन्ड पॉलिटिकल विकली'मध्ये प्रकाशित झाले. हाच शोधनिबंध २०१९-२० मधील सर्वोत्तम पाचमधील एक ठरला.

# डॉ. ज्ञानदेव तळुले यांचा समावेश

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

इकॉनॉमिक अ‍ॅण्ड पॉलिटिकल विकली (इपीडब्लू) या



नियतकालिकेच्या गतवर्षीच्या पहिल्या पाच सर्वोत्कृष्ट संशोधक लेखकांच्या यादीत शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागाचे प्रमुख प्रा. डॉ. ज्ञानदेव तळुले यांचा समावेश झाला आहे. विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकरी आत्महत्यासंदर्भातील प्रा. तळुले यांच्या शोधनिबंधासाठी त्यांचा टॉप फाईव्हमध्ये गौरव करण्यात आला. प्रा. तळुले यांनी २००१ ते जुलै २०१८ या कालखंडातील आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांची माहिती संकलित केली आहे. १५१९ आत्महत्याग्रस्त कुटुंबांचे सर्वेक्षण केल्यानंतर हाती आलेल्या माहितीचे विश्लेषण करून त्या आधारावर त्यांनी विस्तृत शोधनिबंध तयार केला. आत्महत्या रोखण्यासाठी प्रशासकीय स्तरावर काय उपाययोजना करता येतील, याची मांडणीही त्यांनी केली आहे.

# उद्या वेबिनार

वारणानगर : येथील यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयांमध्ये अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व भूगोल शास्त्र विभागाच्यावतीने दि. ७ जानेवारी रोजी 'भू-तंत्रज्ञान व आपत्ती व्यवस्थापन' या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय वेबिनारचे आयोजन केले आहे. या वेबिनारचे स्वागताध्यक्ष वारणा विभाग शिक्षण मंडळाचे अध्यक्ष आमदार डॉ. विनय कोरे असून, कार्यक्रमासाठी केंद्रीय विद्यापीठ, तामिळनाडू येथील डॉ. बालसुब्रमणी के तसेच शिवाजी विद्यापीठातील भूगोलशास्त्र विभागप्रमुख डॉ. संभाजी शिंदे, प्रोफेसर डॉ. एस. एस. पन्हाळकर व अभिजित पाटील यांना साधन व्यक्ती निमंत्रित करण्यात आले आहेत.

# नैतिक मूल्यांच्या जोपासनेला महत्त्व

कोल्हापूर : मनुष्यबळ विकास क्षेत्रात प्रामाणिकपणा, समर्पण वृत्ती आणि नैतिक मूल्यांच्या जोपासनेलाही तितकेच मोठे महत्त्व आहे. देशाच्या भवितव्याशी थेट संबंध असल्याने नैतिक मूल्यांचा संकोच होणे कोणालाच परवडणारे नाही. त्याची जाणीव करून देणारा उत्तम संदर्भग्रंथ डॉ. एच. एम. ठकार आणि ताहीर झारी यांनी निर्माण केला आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी शुक्रवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाच्या एमबीए युनिटचे डॉ. ठकार आणि देशभक्त रत्नाप्पा कुंभार वाणिज्य महाविद्यालयातील डॉ. झारी यांनी लिहिलेल्या 'एथिकल परस्पेक्टीव्ह्ज ऑफ ह्युमन रिसोर्स मॅनेजमेंट' या पुस्तकाच्या प्रकाशनावेळी ते बोलत होते. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. एस. एस. महाजन, व्ही. एन. पाटील यांनी मनोगते व्यक्त केली.